# ठाणे महानगरपालिका,ठाणे

## लेखापरीक्षा विभाग

## जाहिरात

**करार पद्धतीने मानधन तत्वावर सेवानिवृत्त लेखापरीक्षकांच्या सेवा उपलब्धतेसाठी जाहिरात**

लेखापरीक्षा विभाग,ठाणे महानगरपालिका,ठाणे यांचे मार्फत ०३ महिन्याच्या कालावधीसाठी महापालिका मुख्य लेखापरीक्षक,महालेखाकार व स्थानिक निधी लेखा विभागाने घेतलेल्या आक्षेपांचे निराकरण करण्यासाठी करार पद्धतीने मानधन तत्वावर सेवानिवृत्त लेखापरीक्षकांच्या सेवा उपलब्ध करणेसाठी इच्छूक व पात्र सेवानिवृत्त लेखापरीक्षकांकडून अर्ज मागविण्यात येत आहेत. सदरचे अर्ज मुख्य लेखापरीक्षक,ठाणे महानगरपालिका,ठाणे, प्रशासकीय भवन,दुसरा मजला, चंदनवाडी, पाचपाखाडी,ठाणे यांच्याकडे दि.०४/०६/२०२१ पर्यंत पाठवावेत.अर्जाच्या लिफाफ्यावर **करार पद्धतीने मानधन तत्वावर सेवानिवृत्त लेखापरीक्षक या पदासाठी अर्ज** असे ठळक अक्षरांत नमूद करावे.अर्जासोबत स्वतःचा पत्ता असलेला व त्यावर रू.५/- चे पोस्ट मुंद्राक चिकटवेल्या १५ सें.मी X १० सें.मी आकाराचा लिफाफा पाठविण्यात यावा. निवडलेल्या लेखापरीक्षकांना त्यांच्या सेवा लेखापरीक्षणासाठी घेण्यात येत असल्याबाबतची पत्रे पोस्टाने/ई-मेल द्वारे पाठविण्यात येतील.

**पदाचे नाव :** करार पद्धतीने मानधन तत्वावर सेवानिवृत्त लेखापरीक्षक

१. **आवश्यक लेखापरीक्षकांची संख्या :** १४

२. **पात्रतेचे निकष :**

अ) महाराष्ट्र वित्त व लेखा सेवा गट ब (राजपत्रित/अराजपत्रित) संवर्गातून सेवानिवृत्त झालेले अधिकारी

ब) नियत वयोमानानुसार सेवानिवृत्त झालेल्या अधिकारी/ कर्मचा-याचे वय ६५ वर्षाहून अधिक नसावे.

क) अधिकारी/कर्मचारी शारिरीक दृष्टया सक्षम असावा.

ड) त्याला शासकीय नियमांची तसेच लेखापरीक्षण विषयक अधिनियम व नियमांची माहिती असावी.

इ) सेवानिवृत्त अधिकारी/ कर्मचारी यांच्याविरुद्ध त्यांच्या शासकीय सेवा कालावधीतील कामकाजाबाबत कोणत्याही प्रकारचे विभागीय चौकशी अथवा न्यायालयीन प्रकरण प्रलंबित नसावे.

ई) करारपद्धतीने निवड करावयाच्या अधिकारी / कर्मचारी यांनी विहीत नमुन्यातील वचनपत्र भरून देणे आवश्यक आहे.

**३. मानधन :**

करार पद्धतीने मानधन तत्वावरील लेखापरीक्षकांना शासन निर्णय क्र. संकीर्ण-२७१५/प्र.क्र.१००/१३ दि.१७/१२/२०१६ नुसार मानधन देण्यात येईल.

सही/-

मुख्य लेखापरिक्षक

ठाणे महानगरपालिका,ठाणे